आयुष्यमान आरोग्य मंदिरामार्फत प्रभावी डे केअर सेवा देणेबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : श्रेणी-२०२६/प्र.क्र.८३/पासु-१(ई.क्र.१८६९०७१)
१० वा मजला, गोकुलदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
मंत्रालय, मुंबई -४०० ००१
दिनांक : २९ ऑक्टोबर, २०२६

वाचा:-

१) भारत सरकार स्वास्थ एवं परिवार कल्याण, मंत्रालय यांचे, दिनांक २५ नोव्हेंबर, २०२३ चे पत्र.
२) भारत सरकार स्वास्थ एवं परिवार कल्याण, मंत्रालय यांचे Ayushman Bharat Comprehensive Primary health Care through Health and Wellness Centers, Operational Guidelines , dt.17th September, 2018.
३) भारत सरकार स्वास्थ एवं परिवार कल्याण ,मंत्रालय यांचे दिनांक १ जुलै, २०१९ चे पत्र.
४) संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य यांचे जा.क्र./आसेआ/संचालक कक्ष / राज्याची अत्यावश्यक औषधी यादी (EDL) आणि , ऐच्छिक यादी (DL) संस्था निहाय यादी, दिनांक ९ नोव्हेंबर, २०२६.
५) सहसंचालक, आरोग्य सेवा, (प्राआकेंद्र/उपकेंद्र/दवाखाने) मुंबई यांचे पत्र क्र.आसेआ/कक्ष-७अ /आरोग्यवर्धिनी केंद्र श्रेणीवर्धन /२०२६/५६०७, दि. २४/०९/२०२६.

प्रस्तावना :-

भारत सरकार स्वास्थ एवं परिवार कल्याण मंत्रालय यांचे दिनांक २५ नोव्हेंबर, २०२३ चे पत्रान्वये लोकांना त्यांच्या घराजवळ सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा (Comprehensive Primary Health Care - CPHC) मोफत आणि दर्जेदार पद्धतीने उपलब्ध करून देण्याच्या हेतूने उपकेंद्र /आरोग्य वर्धिनी केंद्र यांच्या मार्फत देण्यात येणा-या सुविधा व्यापक करुन त्यांना आयुष्यमान आरोग्य मंदिरे असे नामकरण करण्यात आले आहे.

या केंद्रांमार्फत देण्यात येणाऱ्या सेवांची व्याप्ती वाढवून सेवा अधिक प्रभावी, गुणवत्तापूर्ण व सातत्यपूर्ण रीतीने देण्यासाठी सुधारित कार्यपद्धती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

आयुष्यमान आरोग्य मंदिरामार्फत देण्यात येणा-या सेवा अधिक व्यापक करुन लोकांच्या घराजवळ, गुणवत्तापूर्ण, सातत्यपूर्ण व सर्वसमावेशक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

२. उपकेंद्र- आयुष्यमान आरोग्य मंदिर स्तर बाह्यरुग्ण सेवा आणि क्षेत्र भेटी चे नियोजन:

दिवस	वेळ	कामकाज
सोमवार ते शुक्रवार	सकाळी ०८:०० ते दुपारी १२:३०	बाह्यरुग्ण सेवा (OPD)- यात सर्व प्रकारच्या रुग्णांची तपासणी व आवश्यकतेनुसार औषधोपचार देण्यात येईल. तसेच रक्त तपासण्या करण्यात येतील.
	दुपारी ०२:०० ते सायंकाळी ०४:००	क्षेत्र भेटी / बाहयरुग्ण (OPD) सेवा देणे - समुदायस्तरीय बाह्यरुग्ण सेवा, यात जेथे समुदाय आरोग्य अधिकारी नसतील किंवा अधिक गावे असतील तेथील आयुर्वेदिक /ॲलोपॅथिक दवाखान्यातील वैद्यकिय अधिकारी यांचा पण सहभाग प्राथमिक आरोग्य केंद्र, वैद्यकिय अधिकारी यांनी नियोजन करताना करावा.
	सायंकाळी ०४:०० ते ०५:००	गृह भेटी
	सायंकाळी ०५:०० ते ०५:३०	दिवस भरातील कामकाजाच्या नोंदी व संबंधित पोर्टलवर माहिती अद्ययावत करणे.
शनिवार	सकाळी ०८:३० ते दुपारी १२:३०	बाह्यरुग्ण सेवा (OPD), उपकेंद्र किंवा प्रा.आ.केंद्र स्तरावर सभा, ई-संजीवनी /टेली मेडिसीन

३.कार्यपद्धती :-

१) समुदाय आरोग्य अधिकारी ०८:३० ते १२:३० या कालावधीत उपकेंद्र, आयुष्यमान आरोग्य मंदिरे येथे बाहयरुग्ण सेवा देतील. यात सर्व प्रकारच्या रुग्णांची तपासणी व आवश्यकतेनुसार प्राथमिक स्तरावरचे सर्व उपचार देण्यात येतील. BSC नर्सिंग कर्मचारी व समुदाय आरोग्य अधिकारी (CHO) असलेल्या ठिकाणी ई-संजीवनी प्रणालीव्दारे प्राप्त सुचनेनुसार औषधोपचार करण्यात यावा.

२) या सेवा देत असताना आयुष्यमान आरोग्य मंदिरांच्या अनुषंगाने संदर्भ क्र.२ अन्वये शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार बाहयरुग्ण विभागात आलेल्या रुग्णांना आजारांवर (प्राथमिक) औषधोपचार द्यावा.

३) नियमितपणे ई-संजीवनी /टेली मेडिसीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा. तज्ज्ञ सल्ला ई-संजीवनी /टेलीमेडिसीनद्वारे उपलब्ध करून देण्यात यावा.

४) दररोज एका गावास भेट देऊन त्या गावात साधारणपणे दुपारी २:०० ते ४:०० या कालावधीत बाहयरुग्ण सेवा द्यावी.गावातील बाहयरुग्ण सेवा अंगणवाडी केंद्र/ प्राथमिक शाळा / ग्रामपंचायत कार्यालयातील जागेमध्ये देण्यात यावी. ही सेवा निश्चित दिवस आणि निश्चित वेळ या तत्वावर देण्यात यावी. आरोग्य सेवासत्राचा पूर्वी ठरविण्यात आलेला त्या गावातील दिवस बदलण्यात येऊ नये आणि समुदाय आरोग्य अधिकारी (CHO) / वैद्यकिय अधिकारी, दवाखाने (MO Dispensary) / वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र (MO PHC) यांनी त्याप्रमाणे आपले फिरती दिवस निश्चित करावे.

५) स्थानिक आशा/अंगणवाडी कार्यकर्त्यांमार्फत गावातील लोकांना समुदाय आरोग्य अधिकारी यांची भेट व बाहयरुग्णसेवा याबाबत माहिती देण्यात यावी.

६) आरोग्य सेविका व आरोग्य सेवक गावातील गरोदर माता, स्तनदा माता, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया झालेल्या माता, लहान बालके, असंसर्गजन्य / संसर्गजन्य आजाराबद्दल उपचार घेत असलेले रुग्ण यांच्या घरी भेट देऊन पाठपुरावा करतील.

७) समुदाय आरोग्य अधिकारी यांनी आरोग्यवर्धिनी केंद्रात दैनंदिन सर्व साधारणपणे १०-१५ रूग्ण व गाव भेटीमध्ये १५-२० रूग्ण तपासणे अपेक्षित आहे.

८) आयुष्यमान आरोग्य मंदिर यांनी राज्य यादी प्रमाणे औषधी व यात इंजेक्शन आणि सलाईन (I.V.) ची उपलब्धता असावी.

९) गृह भेटी दरम्यान, टी. बी. आणि कुष्ठ रूग्ण भेट व तपासणी, सिकल सेल रूग्ण आणि उपनाशक (Palliative Care) रूग्ण भेट व तपासणी, उच्च जोखमीची माता व बालक तपासणी, नवजात बालक तपासणी/भेट, राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम (NVBDCP) अंतर्गत सर्वेक्षण इत्यादी कामे करावीत. तसेच असंसर्गजन्य आजार तपासणी अंतर्गत संशयितांची तपासणीही करावी. दिवस भरातील कामकाजाच्या नोंदी व संबंधित माहिती पोर्टलवर अद्ययावत करावी.

४. आयुष्यमान आरोग्य मंदिर सक्षम करणे: -

१) आयुष्यमान आरोग्य मंदिर केंद्रात संदर्भ क्र.३ अन्वये, भारत सरकारच्या मार्गदर्शक सुचनेनुसार १४ प्रकारच्या प्रयोगशाळा तपासण्या करण्यात याव्यात.

२) आयुष्यमान आरोग्य मंदिर केंद्रात अत्यावश्यक औषधे (Essential Drugs) असणे आवश्यक आहे.

३) कार्यपध्दतीमध्ये नमूद केलेल्या सेवा देण्यासाठी आवश्यक साहित्य व साधनसामुग्री असावी.

४) नियमित ई-संजीवनी (टेली मेडिसीन) या पोर्टलच्या सुविधेचा वापर करावा.

५) या सेवांबद्दल लोकांमध्ये जनजागृती करावी.

५. आयुष्यमान आरोग्य मंदिर केंद्राचे कामाचे संनियंत्रण व पर्यवेक्षण: -

समुदाय आरोग्य अधिकारी यांनी दिलेल्या बाहयरुग्ण सेवा (आयुष्यमान आरोग्य मंदिर व गावामधील सेवा), त्यांच्या चमु मार्फत देण्यात येणा-या भेटी, कामावर आधारित मोबदला मार्गदर्शक सुचनेप्रमाणेच देण्यात येत आहे याची खात्री करणे, तसेच आयुष्यमान आरोग्य मंदिर केंद्राचे संनियंत्रण व पर्यवेक्षण करण्याची जबाबदारी तालुका आरोग्य अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांची राहील.

६. पर्यवेक्षणाकरीता आरोग्य निर्देशांक : -

१) दैनंदिन बाहय रुग्ण संख्या
२) आठवडी बाहय रुग्ण संख्या
३) टेलिमेडीसीनद्वारे तज्ञ सल्ला घेतलेले रुग्ण
४) आजार निहाय रुग्ण तपासणी संख्या
५) किती रुग्ण संदर्भित केले व त्याची कारणे
६) देण्यात आलेल्या गृहभेटी
७) आठवडी घेण्यात आलेल्या योगा सत्र ची संख्या
८) दैनंदिन आयुष्यमान आरोग्य मंदिर पोर्टल (AAM Portal) व इतर पोर्टल ची दैनंदिन नोंद केली आहे किंवा कसे

या नमूद निर्देशांकानुसार पर्यवेक्षकीय अधिकारी यांनी सनियंत्रण करावे. आरोग्यवर्धिनी केंद्राचे कामाचे संनियंत्रण व पर्यवेक्षण यांचे टप्पे पुढील प्रमाणे राहतील;

१) दैनंदिन पर्यवेक्षण - प्राथमिक आरोग्य अधिकारी वैद्यकिय अधिकारी (PHC MO)
२) आठवडी पर्यवेक्षण - तालुका वैद्यकिय अधिकारी (THO)
३) मासिक पर्यवेक्षण - जिल्हा आरोग्य अधिकारी (DHO)

राज्य स्तरावरून नियमित आढावा आणि क्षेत्रभेटीद्वारे कार्यक्रमाचे नियंत्रण करावे. यासाठी सहसंचालक (प्राथमिक) आरोग्य सेवा, आयुक्तालय हे सनियंत्रण अधिकारी राहतील आणि कार्यकारी संचालक, राज्य आरोग्य प्रणाली संसाधन केंद्र (SHSRC), पुणे हे तांत्रिक बाबीत समन्वयाने कामकाज करतील. त्याचप्रमाणे आवश्यकतेनुसार कार्यक्रमाचे मूल्यमापन करतील.

७. आयुष्यमान आरोग्य मंदिर (उपकेंद्र) सेवांचे बळकटीकरण करण्यासाठी समिती :-

आयुष्यमान आरोग्य मंदिर सेवांची गरजेनुसार व्याप्ती वाढविणे व सेवांची गुणवत्ता उच्च दर्जाची राहील यासाठी मार्गदर्शक सुचना देण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

अ.क्र.	पद	भुमिका
१	संचालक, (प्राथमिक), आरोग्य सेवा, पुणे	अध्यक्ष
२	सहसंचालक (प्राथमिक) आरोग्य सेवा, मुंबई	सदस्य,सचिव
३	सहसंचालक (तांत्रिक), राआअ, मुंबई	सदस्य
४	कार्यकारी संचालक, SHSRC, पुणे	सदस्य
५	संचालक, राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था (SIHFW), नागपूर	सदस्य

६	डॉ. अर्चना पाटील (माजी संचालक, आरोग्य सेवा)	अशासकीय सदस्य
७	लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर (सेवानिवृत्त)	अशासकीय सदस्य

या समितीने तीन महिन्यातून एकदा बैठक घेऊन आयुष्यमान आरोग्य मंदिर स्तरावर (AAM) देण्यात येणा-या सेवांचा आढावा घेऊन मार्गदर्शनपर अहवाल तयार करुन आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई, यांचे मार्फत शासनास सादर करावा. तसेच उपरोक्त प्रमाणे मार्गदर्शक सुचनांची अंमलबजावणी होईल याची निश्चिती करावी.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१०२९१७०५०२३४१७ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Deepali Sayaji Patil

Digitally signed by Deepali Sayaji Patil
DN: cn=Deepali Sayaji Patil, o, ou, email=deepali.patil@nic.in, c=IN
Date: 2026.10.29 18:53:52 +05'30'

(दिपाली पाटील)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
५) संचालक, (प्राथमिक), आरोग्य सेवा, पुणे.
६) सहसंचालक, (प्राथमिक), आरोग्य सेवा, मुंबई.
७) सहसंचालक (तांत्रिक), राआअ, मुंबई
८) कार्यकारी संचालक, SHSRC, पुणे
९) संचालक, राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था (SIHFW), नागपूर
१०) डॉ. अर्चना पाटील (माजी संचालक, आरोग्य सेवा)
११) लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर (सेवानिवृत्त)
१२) अतिरिक्त संचालक/सहसंचालक, आरोग्य सेवा, आयुक्तालय, मुंबई.
१३) संचालक (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
१४) अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
१५) सर्व विभागीय आयुक्त.

१६) सर्व जिल्हाधिकारी.

१७) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

१८) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी / जिल्हा शल्य चिकित्सक.

१९) निवड नस्ती (पासु-१).